ISSN 2230-7850 Impact Factor : 4.1625 (UIF) Volume - 6 | Issue - 7 | August - 2016

Indian Streams Research Journal

# " राजर्षि शाहू महाराजांच्या समतावादी विचारांची कालसमर्पकता "

डॉ. सौ. मीना गायकवाड
प्रमुख, समाजशास्त्र विभाग,
यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय वारणानगर,
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.
.

**ABSTRACT:**
सामाजात सामाजिक न्याय समतावाद, मानवतावाद, बंधूभाव याची चर्चा भारत आणि जगात जेव्हा जेव्हा होईल तेव्हा तेव्हा फुले, शाहू, आंबेडकरी विचार धारेला स्मरावेच लागेल. फुल्यांच्या विचारांचा शाहूनी व फुले-शाहूंच्या विचारांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वारसा चालविला आणि संपूर्ण क्रांती पर्व निर्माण केले. "राजर्षी शाहू महाराज आणि विरोधकांची काकगर्जना " हा लेख डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहून (बहिष्कृत भारत) राजर्षी शाहुंच्या विचारांचे समर्थनही केले. इतिहासातील काही लिखित पुराव्यावरुन महात्मा जोतिबा फुल्यांना बाबासाहेबांनी त्यांचे गुरु मानले होते. महात्मा ज्योतिबांचीच विचार कार्ये शाहुंनी त्यांचा राज्य कारभार चालविताना आचरणात आणली. शाहूंची कार्ये चिरंतन आहेत म्हणूनच मानवतावादी, समतावादी, कार्य करणाऱ्या जाणता राजा, लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या या कार्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न सदर शोधनिबंधातून केला आहे. कारण आज भारत जागतिकीकरणाच्या युगात जगताना अनेक समस्या समाजा समोर निर्माण झाल्या आहेत त्या सोडविण्यासाठी शाहू महाराजांचे विचार आणि कार्य यांच्या चिंतनाची आवश्यकता स्पष्ट होते व हे विचार आचरणात आणण्याची गरज भासते. प्रस्तुत शोधनिबंध दुय्यम साधन सामुग्रीवर आधारित असून वर्णनात्मक (explainatory) संशोधन पध्दतीचा अवलंब केला आहे. शाहू विचारांचे अध्ययन करुन ते जाणून घेणे, शाहू महाराजांचे समतावादी, मानवतावादी विचार समजून घेणे, ते जनमाणसासमोर प्रकाशात आणणे आणि याविचारांची काल समर्पकता अभ्यासणे हेच उद्देश ठेवून सदर शोधनिबंध लिहीला आहे. विविध तथ्यांवरुन आजच्या काळातही शाहुंची विचार कार्ये कालसमर्पक आहेत असा निष्कर्ष निघतो. हा शोधनिबंध पुरोगामी विचारांच्या समाजसुधारक कार्यकर्ते,शाहु विचारांचे संशोधक, अभ्यासक विद्यार्थी शिक्षक यांना उपयोगी ठरेल.

**KEY WORDS :** जाणता राजा, जागतिकीकरण, मानवतावाद, समतावाद, सामाजिक क्रांती, आरक्षण, वेदोक्त प्रकरण लोकराजा.



**प्रस्तावना :-**

जागतिकपातळीवर ज्या ज्या वेळी मानवतावाद, समतावाद, सामाजिक न्याय बंधूभाव यासारख्या मानवी हक्काशी संबंधित घटकांवर चर्चा होईल त्या त्या वेळी फुले - शाहू - आंबेडकर विचारधारेला स्मरावेच लागेल.

प्रथम ' फुले - शाहु - आंबेडकरी विचारधारा ' म्हणजे काय हे समजून घेणे आवश्यक आहे. ही विचार धारा म्हणजे - " जन्मावर आधारित असणाऱ्या उच्च निच प्रकृतीचे पोषण करुन समाजातल्या एका वर्गालाच बहिष्कृत करणाऱ्या संपूर्ण जाती व्यवस्थेच्या वर्गालाच बहिष्कृत करणाऱ्या संपूर्ण जाती व्यवस्थेच्या विरोधात ही विचारधारा असून ही व्यवस्था बदलून समता, स्वातंत्र्य, बंधुभाव, विज्ञानवाद, बुध्दीवाद आणि विवेकवाद या शाश्वत मुल्यांवर आधारित नवसमाज निर्मिती करु पाहणारा विचार प्रवाह आहे. जात, धर्म, पंथ या पलीकडे जावून माणसाला माणूस बनविण्यचा हा विचार प्रवाह आहे. "

सुधारणावादी विचारांचा वारसा म. फुल्यांच्या विचार

कार्यातून जरी शाहू महाराजांनी घेतला तरी महाराजांचे स्वतंत्र समतावादी दृष्टीने केलेले कार्य त्याच्या असंख्य साक्षी इतिहासात आढळतात. वेदोक्त प्रकरणात शाहू – टिळकांचा झालेला संघर्ष तरीही शाहू महाराजांनी विविध प्रसंगी घेतलेला समतावादी विचारातूनचा निर्णय, महार, मांग या सारख्या हलक्या समजणाऱ्या जाती प्रती एक राजा म्हणून त्यांनी घेतलेले निणर्य, विविध भाषणातील त्यांचे मांडलेले विचार आणि माणगाव परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकराप्रती घेतलेला निणर्य, कृषी, पाणी, सहकारी संस्था, कारखाने, बँका, शेतकऱ्यांच्या प्रगतीच्या योजना, स्त्री-शिक्षण विषयक इतर भरीव कार्ये, वसतिगृहांचे कार्य अशा विविध कामी त्यांनी प्रचंड चिंतन करुन योजना राबवल्या ज्या सर्वातून केवळ २८ वर्षे राजा म्हणून कार्य करण्यास संधी मिळालेल्या या लोकराजा, जाणता राजाने विश्वक्रांती केली. समतावाद, विश्वममनावर ठसवला.

**संशोधनाची उदिदष्टये :-** १) शाहु महाराजांच्या विचारांचे अध्ययन करणे, २) शाहुंच्या समतावादी विचारकार्याचे अध्ययन करणे, ३) शाहूंच्या समतावादी विचार कार्याची कालसमर्पकता अभ्यासणे.

**संशोधन पध्दती :-** येथे वर्णनात्मक संशोधन पध्दती अवलंबली असून, प्रस्तुत शोध निबंध दुय्यम साधन सामुग्रीवर आधारित आहे विविध संदर्भग्रंथ, नियतकालिक, इंटरनेट याचा वापर करुन माहिती मिळवली आहे व त्यातून निष्कर्ष काढले आहेत.

### आशय विश्लेषण :-

### ⁕ वेदोक्त प्रकरण आणि शाहुंचा समतावाद :-

१८९९ मध्ये कार्तिक स्नानाच्या वेळी घडलेले वेदोक्त प्रकरण. त्यावेळी वेदोक्तांचा अधिकार म्हणजे हिंदू धर्मातील १६ संस्कार व इतर धर्मकृत्ये हा अधिकार ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्यांना होता. शुद्रासाठी पुराणोक्त मंत्राची उपाययोजना होती. काळाच्या ओघात या सर्व तीन वर्णा ऐवजी फक्त ब्राम्हण हा एकच उच्च वर्ण आहे बाकी सर्वांना शुद्रकात ढकलले व स्वता: राजांनाच शुद्र ठरवून पुरोणाक्त मंत्र म्हटले गेले. यात महाराजांचे क्षत्रियत्व नाकारणारा त्यांच्याच दरबारी असणारा सेवक, आश्रित त्या ब्राम्हण व्यवस्थेचा प्रतिनिधी होता. या प्रकरणामध्ये बलशाली अशी ब्राम्हण परंपरा याच्या मागे होती. लोकमान्य टिळक, शाहू महाराजांचे स्नेही होते. त्यांच्यात चांगले संबंध होते. मात्र वेदोक्त प्रकरणावेळी लोक मान्य टिळकांनी केसरीतून महाराजांवर जोरदार टिका केली. त्यांच्या विरोधात उभे राहिले. तरीही इंग्रज राजवटीची बंधने असतांनाही शाहू महाराजांनी टिळकांच्या स्वराज्याच्या आंदोलनाला हस्ते परहस्ते आर्थिक मदत करीत होते. इतकेच नव्हे तर टिळक आजारी पडल्यावर त्यांनी विश्रांतीसाठी पन्हाळयाला यावे असा आग्रहही त्यांनी धरला. या प्रसंगातून त्यांच्या मनाची विशालता, उत्तुंगता लक्षात येते. जाती व्यवस्था नष्ट झाल्याशिवाय देशाची खरी प्रगती होणार नाही या त्यांच्या स्पष्ट भूमिकेचा, समाजिक समतेच्या विचार आणि कृतिचा प्रत्यय अशा प्रसंगातून स्पष्ट होतो. आजच्या जागतिकीकरणाच्या काळात कार्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्ते आणि नेते यांनी हा शाहू महाराजांच्या सामाजिक समतेचा विचारकृती स्विकारली आहे का? हा प्रश्न निर्माण होतो व या जागतिकी करणाच्या युगात देशाच्या गुणात्मक विकासासाठी याची गरज पुन्हा पुन्हा प्रतीत होते.

### ⁕ मजूर संघ आणि शाहूंची समतावादी दृष्टी :-

महाराजांचे आपल्या संपूर्ण प्रजाजनावर बारकाईने डोळस लक्ष होते व सर्वांना न्याय देण्याची त्यांची दृष्टी होती. तत्कालीन व्यवस्थेनुसार जी "अस्पृश्यता" समाजात रुढ होती अश्या अस्पृश्यांच्या प्रती शाहू महाराजांच्या मनात केवळ सहानुभूतीच नव्हती तर समतावादी दृष्टी होती. म्हणूनच अस्पृश्यांचे " मजूर संघ " बनावेत अशी अस्पृश्य मजुरांप्रती त्यांची भावना होती यालाच मूर्त रुप देण्यासाठी शाहु महाराजांनी विकासाच्या योजना आखून संपूर्ण समाजाचा विकास साधला. त्यांच्यातील समतावादी दृष्टीमुळेच समाजातल्या शेवटच्या माणासाची चिंता मनात बाळगुन संपूर्ण प्रजेच्या विकासाची भौतिक पाया भरणी सर्व स्तरावर शाहू महाराजांनी केली होती.

### ⁕ शाहु महाराजांची विविध भाषणे आणि समतावादी दृष्टी :-

शाहु महाराजांच्या वेगवेगळया प्रसंगानुरुप झालेल्या भाषणातून त्यांनी केलेल्या विकासातून घटना प्रसंगातूनही त्यांच्यातला मानवतावाद आणि समतावाद स्पष्ट होतो. १५ एप्रिल १९४० नाशिक येथील एका भाषणात ते म्हणतात जाती द्वेष हा हिंदुस्थानच्या फार पुराना रोग आहे. परशुरामाने नि:क्षत्रिय पृथ्वी केली. या म्हणण्यात जातीद्वेषाचे प्रतिबिंब पूर्णपणे पडलेले दिसले. पेशव्यांनी ब्राम्हणोत्तरांच्या घरावर गाढवाचे नांगर फिरवले याचेही कारण तेच.(वरील संदर्भ क्रांती सुक्ते राजर्षि छ. शाहू महाराज पृ.१६ वर आढळतो.)

२२ मार्च १९१० माणगावची परिषद ही इतिहासात गाजलेली परिषद या परिषदेत ही भाषण करतांना त्यांच्यातील समतावादी दृष्टी स्पष्ट होते. तत्कालीन प्रथे प्रमाणे तुच्छ समजल्या जाणाऱ्या अतिशुद्र समजल्या जाणाऱ्या काही जमातीतील लोकांना रोज हजेरी द्यावी लागली होती. एखाद्या गावात चोरी झाली की, या हजेरी वाल्या लोकांना पकडले जाई. हे शाहु महाराजांना अजिबात पसंत नव्हते. वेळोवेळी ते हे स्पष्ट करत. त्यावर उपाय शोधत होते. या संदर्भात एका भाषणात ते म्हणतात – " हजेरीच्या लोकांपेक्षा बिनहजेरीच्या लोकातच गुन्हेगारांची संख्या जास्त आहे. " हे खरेही होते त्यांना या गोष्टींचा बऱ्याच प्रसंगी प्रत्यय येत होता. कारण जात या घटकाच्या निकषावर अनेकांना कनिष्ठ वर्गियांना गुन्हेगार म्हणून त्यांच्यावर अन्याय केला जात असे. हे मानवतेच्या विरोधात आहे असे त्यांचे स्पष्ट मत होते.

आणखी एका भाषणातून त्यांनी केलेल्या विधानातून पुन्हा एकदा त्यांच्यातील समतावादी दृष्टी स्पष्ट होते. ज्या ब्राम्हणांच्या शेंडया आणि जानव्ही यांचे रक्षण शिवाजी महाराजांनी केले ते मराठी शुद्र आहेत असे ब्राम्हण म्हणतात. अशी तक्रार भाषणातून करण्या बरोबरच "जातीभेद मोडून आपण सर्व एक होवू या " असे आव्हानही ते प्रजेला करताहेत.

### ⁂ कनिष्ठ वर्गीयांना बहाल केलेल्या विविध पदव्या आणि शाहूंची समतावादी दृष्टी :-

शाहुंचे कार्य बहुआयामी सर्वांगीण, सर्व समावेशक आहे. त्यांच्या समतावादी दृष्टीचा प्रत्यय मात्र त्यांच्या प्रत्येक कार्यातून येतो. शाहूकालीन परंपरेनुसार अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या काही मागास जाती जमातीतील लोकांना वेगवेगळया हिणकस वागणुक दिली जात होती. व्यक्ती प्रतिष्ठेची मानहानी केली जात होती. त्यांच्या जातीच्या नावावरुनही समाजात वावरताना त्यांना अपमानकारक वागणुक त्यांना दिली जात होती. शाहू महाराजांना समाजात वावरताना हे जाणवत होते. ब्राम्हण समाजातील बुध्दीवान विचारवंतानी स्वत:ला भूदेव समजून इतरांना हीन लेखल्यामुळे देशाची प्रगती संपण्याचे सत्य महाराजांनी ओळखले म्हणूनच महाराजांनी त्यांची कनिष्ठ जातीची ओळखच पुसण्यासाठी, त्यांचा सन्मान वाढण्यासाठी महार, मांग, भंगी यांना विशेषता: महारांना 'जाट', चांभाराच्या पैलवानाना 'सरदार', भंग्यांना 'पंडीत' अशा पदव्या दिल्या त्यांचा उद्देश पारदर्शक होता. त्या मागास लोकांचा सन्मान वाढावा आणि त्यांच्यातील हिनतेची भावना दूर व्हावी. पण यामुळे उच्चवर्गिय लोकांचा अपमान होत आहे अशा तक्रारीही महाराजांना आल्या पण त्यांनी त्या धुडकावून लावल्या.

त्यांचे शिक्षण विषयक वैविध्य पूर्ण काम, वसतिगृहाचे कार्य, गंगाराम कांबळेच्या संदर्भातील कार्ये, स्त्री शिक्षण विषयक कार्ये, शेतीविषयक कार्ये अशा अनेक कार्य प्रसंगातून त्यांचा समतावाद स्पष्ट होतो. राजा म्हणून काम करण्याची संधी शाहू महाराजांना केवळ २८ वर्षे मिळाली पण त्या काळाचे त्यांनी सोने करुन जगासमोर समतावादाचा मावतावादाचा आदर्श ठेवला.

### निष्कर्ष :-

शाहू महाराज अद्वितीय राजे होते. सत्ता, संपत्तीचा उपयोग सामाजिक क्रांतीसाठी करणारे अधुनिक भारताचे ते शिल्पकार होते. १९९१ मध्ये झालेल्या गॅट करारतून भारतात औपचारिक जागतिकीकरणाला सुरवात झाली. आज उत्तर जागतिकीकरणाच्या काळात भारतातल्या सर्वसामान्य माणसाचे जगणे मुश्किल झाले आहे. ही प्रक्रिया बहुआयामी, सर्वस्पर्शी व्यापक आहे. महागाई, बेकारी, दहशतवाद, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, स्त्रीभूणहत्या, बलात्कार, सामुहिक बलात्कार, अशा हजारो समस्याने जग त्रस्त आहे. अशा काळात समाजाची दिशा कोणत्या स्वरुपाची असावी, मार्ग कोणते शोधावेत या सर्वांची उत्तरे शाहूंच्या मूलभूत विचारांच्या चिंतन आणि प्रचंड प्रमाणात समतावादी दृष्टीने केलेल्या कार्यात मिळते. शाहू महाराज विज्ञानवादी, समाजवादी, कलावादी आणि उद्योगप्रिय होते. शाहूच्या या दृष्टीने समाजाची मूलभूत रचना बदलण्याचा प्रयत्न केला तर पुन्हा एकदा सर्वार्थाने देश वैभवशाली बनेल यात शंका नाही.

### संदर्भ :-

१) डॉ. पवार जयसिंगराव (संपादित) – " राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ " – २६ जून २००७ महाराष्ट्र इतिहास प्रबोधीनी – कोल्हापूर.

२) डॉ. कांबळे नारायण – डॉ. बंलाटे व्यंकट आणि डॉ. शिंदे संजय – (संपादित) –
"राजर्षि शाहू – नव्या दिशा नवे चिंतन "– २६ जानेवारी २०११– चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

३) प्रा. साळुंखे नाना साहेब – "शाहुंच्या आठवणी" २९ ऑक्टोबर २०१६ वृषाली प्रकाशन कोल्हापूर

4) https.www.loksatta.com.>new .....

5) https://en.m.wikipedia.org.>Article--

6) https://www+eahthougut.com